**संगणक ,प्रिंटर,लॅपटॉप, सर्व्हर व इतर आयटी उपकरणांचे आयुष्यमान (Life) ठरविणे व कालबाहय झालेल्या उपकरणांची विल्हेवाट लावणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक मातंसं /नस्ती ०७ /प्रक्र-८९ /३९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:-- ४ जानेवारी, २००८

**वाचा:-** सा.प्र.वि १) शासन निर्णय क्रमांक सिओएम१०९८/प्र.क्र.२१२/९८/३९, दिनांक: ५ ऑक्टोबर २००१
२) शासन निर्णय क्रमांक सिओएम१०९८/प्र.क्र.२१२/९८/३९, दिनांक: ५ ऑक्टोबर २००२
३) शासन निर्णय, क्रमांक सिओएम २००४/प्रक्र४३६/३९, दिनांक १७ मे २००६

**प्रस्तावना-**

माहिती तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर करुन राज्याचे प्रशासन अधिक गतीमान, लोकाभिमुख आणि पारदर्शक करण्याच्या दृष्टीने प्रशासकीय कामंकाजाचे संगणकीकरण करण्याचे शासनाने धोरण निश्चित केले आहे. शासनाच्या संगणकीकरणाच्या धोरणानुसार शासनाच्या सर्व विभागात व विभागातील कार्यालयात संगणकीकरणाची कार्यवाही करण्यात आली आहे. संगणक व तद्नुषंगीक आयटी उपकरणे काही काळात निरूपयोगी होतात, त्यांचे सुटे भाग बाजारात उपलब्ध नसतात म्हणून त्यांची दुरुस्ती करणे अशक्य होते.

उपरोक्त दि. १७.५.२००६ च्या शासन निर्णयाद्वारे मात्र सन १९९८-९९ या वर्षी मंत्रालय व नवीन प्रशासकीय भवनात स्थापित असलेले संगणक व तदनुषंगीक उपकरणांची विल्हेवाट लावण्याची कार्यपध्दती विहित करण्यात आली होती. सन १९९८-९९ नंतरच्या कालावधीत किंवा त्यापुर्वी मंत्रालय व नवीन प्रशासकीय भवनात किंवा क्षेत्रीय कार्यालयात स्थापित केलेल्या अशा उपकरणांबाबत निर्णय घेण्यात आलेला नव्हता.

माहिती तंत्रज्ञान या क्षेत्रात झपाटयाने होत असलेली सुधारणा लक्षात घेता संगणक व इतर आयटी उपकरणांचे आयुष्य निर्धारित करणे, निर्धारित आयुष्यापेक्षा जास्त आयुष्य असलेली उपकरणे निर्लेखित करणे व निर्लेखित केलेल्या उपकरणांची विल्हेवाट लावण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

माहिती तंत्रज्ञान विषयक धोरण तसेच संगणकीकरण कृती कार्यक्रम राबविण्यासाठी मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या उच्चाधिकार समितीस दिनांक ५.१०.२००२ च्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये 'माहिती तंत्रज्ञान विषयक सर्व बाबींना मान्यता देण्याचे अधिकार' देण्यात आलेले आहेत. वरील प्रस्तावाबाबत निर्णय घेण्यासाठी दि. १३ नोव्हेंबर २००७ च्या उच्चाधिकार समितीची बैठक झाली व त्यात सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा होवून घेतलेल्या निर्णयान्वये शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे :

**शासन निर्णय:-**

१) 'संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, सर्व्हर व इतर सर्व आयटी संबंधित उपकरणांचे वयोमान ६ वर्ष निश्चित करण्यात येत आहे.

२) 'संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, सर्व्हर व इतर सर्व आयटी संबंधित उपकरणे ज्यांचे वयोमान ६ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त झाले आहे अशी उपकरणे कालबाहय झाल्याने निर्लेखित करण्यायोग्य ठरविण्यात येत आहे.

३) कालबाहय झालेल्या उपकरणांची विल्हेवाट लावण्यासाठी सर्वप्रथम सक्षम अधिकारी निर्लेखन आदेश काढतील. तसेच त्याची नोंद जडवस्तुसंग्रह नोंद वहीमध्ये घेतील. अनुदानाच्या उपलब्धतेनुसार उपकरणाच्या निर्लेखनाबाबत योग्य ते निर्णय घ्यावेत.

४) मंत्रालयीन सर्व विभागात व त्यांचे क्षेत्रीय कार्यालयात संगणक व तद्नुषंगीक बाबींबाबत वेगळयाने जडवस्तुसंग्रह नोंद वही (Hard copy or Electronic form) ठेवावी. सदर वहीत असलेल्या संगणक व तद्नुषंगीक बाबींची नोंद वर्षनिहाय ठेवावी व कोणत्यावर्षी किती साहित्य निर्लेखित होईल या आकडेवारीवरुन आवश्यक रक्कमेची मागणी वार्षीक अर्थसंकल्पात करावी.

५) कालबाहय व निर्लेखित झालेल्या उपकरणांची विल्हेवाट लावण्यासाठी अपेक्षित किंमत (upset price) ठरविण्यासाठी, उपकरणाच्या मुळ किंमतीतून दरवर्षी ६०% (Written Down Value) या पद्धतीने घसारा कमी करून (diminishing) किंमत काढण्यात येईल व काढण्यात आलेली किंमत नजिकच्या रु. १००/- च्या पुर्णाकाएवढी धरण्यात येईल.

६) वरील प्रमाणे ठरविलेल्या अपेक्षित किंमतीवर निर्लेखित केलेली उपकरणे घेण्याचा प्रथम हक्क निर्लेखनापुर्वी ती उपकरणे ज्यांच्या वापरात होती त्यांचाच राहिल. याबाबतचे आदेश संबंधित विभागातील सक्षम अधिकारी निर्गमित करतील. मात्र ज्या उपकरणाचा वापर एका व्यक्तीकडुन होत नसून पूर्ण विभागासाठी होत असेल अशा उपकरणांबाबतचा हक्क संबंधित विभागातील अमुस/ प्रधान सचिव / सचिव हे ठरवतील. ज्या अधिकारी /कर्मचारी यांना प्रथम हक्क देण्यात आला व त्यांनी उपकरणे घेण्यास लेखी नकार दिल्यास त्याबाबतचा हक्क संबंधित विभागानी त्यांच्या विभागातील इतर अधिकारी /कर्मचारी यांना लेखी आदेश काढुन द्यावा. ते उपकरण घेण्यास कोणीही तयार नसल्यास निविदा पध्दतीने त्याची विल्हेवाट लावण्याची कार्यवाही संबंधित विभागाने करावी.

७) मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील ज्या अधिकारी / कर्मचा-यांना उपकरण घेण्याचा प्रथम हक्क देण्यात आला आहे त्यांनी उपकरणाची निर्धारीत किंमत त्यांचे विभागाच्या रोख शाखेत भरावी. संबधित रोखशाखा सदर रकमेचा भरणा एकत्रितरित्या माहीती तंत्रज्ञान संचालनालयाच्या रोखशाखेत करुन तसे प्रमाणपत्र घेतील. रक्कमेचा भरणा केल्यानंतर संबंधित विभागाच्या रोख शाखा सिएमएस चे प्रोजेक्ट मॅनेजर यांचेशी संपर्क साधुन सदर उपकरणातील शासनाची आवश्यक माहिती व सर्व आज्ञावल्या काढुन घेण्यासाठी कार्यवाही करतील आणि त्या आशयाचे प्रमाणपत्र संबंधिताकडुन घेतील. त्यानंतर ते उपकरण संबंधितांना आहे त्या स्थितीत हस्तांतरीत करतील आणि त्याच्या गेटपास बाबत आवश्यक ती कार्यवाही करतील. क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयांबाबत वरील प्रमाणे कार्यवाही संबधित सक्षम अधिका-याकडून तांत्रिक समिती गठण करून करण्यात यावी.

८) मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना पुरविलेल्या संगणक व तदनुंषंगिक बाबींच्या विक्रीतुन प्राप्त झालेल्या रक्कमेचा भरणा, माहिती तंत्रज्ञान संचालनालयातील रोख शाखा, योग्य शीर्षाखाली शासकीय कोषागारात चलनाने करतील. क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयांनी याबाबत त्यांचेस्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

९) विक्रीस घेतलेले उपकरण संबंधितांना हस्तांतरित करीत असताना सदर उपकरणांस काही दोष उद्भवल्यास त्याबाबत विभागाची जबाबदारी रहाणार नाही व वाहतुक आणि जकात इत्यादी बाबतचा खर्च संबंधितांना करावा लागेल असे स्पष्ट करावे.

१०) संबंधित विभागाच्या आस्थापना शाखेने / संगणक शाखेने जड वस्तु संग्रह नोंद वहीत सदर विक्रीबाबत नोंद घ्यावी.

११) वरील धोरण सर्व क्षेत्रीय कार्यालयांना व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील आस्थापनांनाही लागु करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील असलेल्या उच्चाधिकार समितीला शासन निर्णय सिओएम१०९८/प्र.क्र.२१२/९८/३९, दिनांकः ५ ऑक्टोबर २००१ व दि. ५ ऑक्टोबर, २००२ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये व दि.१३ नोव्हेंबर,२००७ रोजी झालेल्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे. उपरोक्त शासन निर्णय दिनांक ५.१०.२००१ च्या परिच्छेद ३ नुसार "उच्चाधिकार समितीने दिलेली मान्यता म्हणजेच माहीती तंत्रज्ञान, नियोजन, व वित्त विभागांनी मान्यता दिली आहे".

या शासन निर्णयाची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आली असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०१०४१७२५५६००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

(भ.प्र.सिंह)
शासनाचे सह सचिव,तथा संचालक (माहिती तंत्रज्ञान)

**प्रति,**

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्यसचिव यांचे खाजगी सचिव,
प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा) मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा) मुंबई,
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
सचिव,महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,(विधान परिषद /विधान सभा),मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / लेखा कोष भवन वांद्रे (पू.) मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषद/महानगरपालिकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व नगरपरिषदांचे मुख्याधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई ४०० ००४, संचालक,शासकीय मुद्रण व लेखनसामग्री,मुंबई
विशेष आयुक्त व प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,महाराष्ट्र सदन,कोपरनिकस मार्ग,नवी दिल्ली
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई
मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती (२ प्रती).